MHKO070004982022

**संक्षीप्त फौजदारी खटला क्र. २८१/२०२२**

**( महाराष्ट्र शासन – वि. – अरुण आवळे )**

**<u>निशाणी क्र. १ वर आदेश</u>**

प्रस्तुतचा खटला महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमामधील कलम ६५(ई) अन्वये दाखल करण्यात आला आहे. आरोपी अरुण बचाराम आवळे याचा मृत्यू झाल्याचे निशाणी क्र. ०३ वरील अहवालाआधारे पोलीस निरीक्षक, कुरुंदवाड पोलीस ठाणे, यांनी सादर केले आहे. सदर अहवालासोबत त्यांनी मृत्यू प्रमाणपत्राची छायांकीत प्रतदेखील हजर केली आहे. सदर मृत्यू प्रमाणपत्राच्या छायांकीत प्रतीचे अवलोकन करता आरोपी अरुण बचाराम आवळे याचा दिनांक २७/०१/२०२२ रोजी मृत्यू झाला असल्याचे दिसते. सबब, आरोपीचा मृत्यू झाल्यामुळे प्रस्तुत प्रकरण पुढे चालविणे न्यायोचित नाही. त्यामुळे खालील अंतिम आदेश पारित करण्यात येतातः–

**<u>आदेश</u>**

१. आरोपीच्या मृत्यूमुळे प्रस्तुतचा खटला संपविण्यात (Abated) येतो.

२. प्रकरण दाखल दप्तर करण्यात येते.

ANAND DEVIDASRAO KARBHAJAN

Digitally signed by ANAND DEVIDASRAO KARBHAJAN
Date: 2024.05.16 17:29:14 +0530

ठिकाण – जयसिंगपूर.

दिनांक – १६/०५/२०२४

( **आनंद दे. करभाजन**)

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

जयसिंगपूर, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर.